| MHRG110006362019 | दाखल तारीख – १९.०८.२०१९ |
|---|---|
| | नोंदणी तारीख – १९.०८.२०१९ |
| | निकाल तारीख – १०.०४.२०२६ |
| | कालावधी – ०६ वर्षे, ०७ महिने, २२ दिवस |

## भाग अ

## फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (I)

| माणगांव येथील न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात<br>ता. माणगांव, जिल्हा– रायगड.<br>[पिठासिन अधिकारी – श्रीमती अ.प्र.मानव(अ.ब.सोनटक्के)] | |
|---|---|
| संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४३३/२०१९ | |
| निशाणी – २२ न्यायनिर्णय | |
| **खटला क्रमांक** | संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४३३/२०१९ |
| **गुन्हा रजिस्टर क्रमांक व पोलीस ठाणे** | गु.र.नं.११/२०१९<br>गोरेगांव पोलीस ठाणे. |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन तर्फे<br>गोरेगांव पोलीस ठाणे |
| **विरुध्द** | |
| आरोपी | **आप्पासाहेब माणिक गर्जे,**<br>वय वर्षे ३५, धंदा – चालक,<br>रा.नाहली, नायगाव, ता.जामखेड, जि.अहमदनगर. |
| **प्रतिनिधीत्व** | |
| **अभियोग पक्ष** | सहा.सरकारी वकील श्री. पी. जे. गावंड |

| | |
|---|---|
| **आरोपीतर्फे वकील** | श्री. आर. के. लिमजे |

## भाग ब

## फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (II)

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | २२.०३.२०१९ |
| फिर्याद पोलीस ठाणेत नोंद झाल्याची तारीख | २२.०३.२०१९ |
| न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख | १९.०८.२०१९ |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | ३०.०९.२०१९ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | १४.०८.२०२४ |
| निकालाची तारीख | १०.०४.२०२६ |
| जर शिक्षा दिली असेल तर आदेशाची तारीख | --- |

| | |
|---|---|
| आरोपीचे नाव | आप्पासाहेब माणिक गर्जे |
| अटकेची तारीख | -- |
| जामीनावर खुला केलेची तारीख | -- |
| दोषारोप ठेवलेले गुन्हे | भारतीय दंड संहिता कलम २७९ प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम १८४, १८५ अन्वये |
| निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | निर्दोष मुक्त केले. |
| दिलेली शिक्षा | अंतिम आदेशाप्रमाणे |
| फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ संपरीक्षेदरम्यान निरुध्द केलेला कालावधी | ------- |

## भाग क

## फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (III)

### अ) अभियोगपक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | श्रीधर शांताराम टेंबे | पंच | १० |
| २. | सतिष शिवाजी कदम | फिर्यादी | १२ |
| ३. | दिलीप महादेव जगताप | साक्षीदार | १५ |
| ४. | गणेश अंकुश भिलारे | साक्षीदार | १६ |
| ५. | रविंद्र ज्ञानदेव ढोबळे | तपासी अंमलदार | १७ |

### ब) बचावपक्षातर्फे साक्षीदारांची यादी – निरंक

### क) अभियोपक्षातर्फे शाबीत करणेत आलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | कागदपत्र | निशाणी |
|---|---|---|
| १. | पंचनामा | ११ |
| २. | फिर्याद | १३ |
| ३. | छापील प्रथम खबर अहवाल | १४ |
| ४. | मो.बा.का.क. २०९ प्रमाणे नोटीस | १८ |
| ५. | वैद्यकीय तपासणी अहवालाबाबतचे पत्र | १९ |

### ड) बचावपक्षातर्फे शाबीत करणेत आलेल्या कागदपत्रांची यादी – निरंक

### इ) आरोपीने कबुल केलेल्या कागदपत्रांची यादी – निरंक

## ई) मुद्देमाल यादी – निरंक

## न्यायनिर्णय

(आज दिनांक १०.०४.२०२६ रोजी पारीत)

प्रस्तुत प्रकरणात आरोपीच्या विरोधात भारतीय दंड संहिता कलम २७९ प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम १८४, १८५ अन्वये दोषारोप ठेवण्यात येवून प्रस्तुतचा खटला चालविण्यात आला.

### सरकार पक्षाचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे आहेः–

०२. प्रस्तुत प्रकरणात एस. एस. कदम, पोलीस नाईक हे फिर्यादी आहेत. दि.२२.०३.२०१९ रोजी रात्री ते कर्तव्यावर असताना ते व त्यांचे सहकारी लोणेरे फाटा येथे रात्रगस्तीकरिता ठाणे दैनंदीनीत नोंद करुन गेले. फिर्यादी व त्यांचे सहकारी यांनी वरिष्ठांच्या तोंडी आदेशावरुन लोणेरे फाटा येथे नाकाबंदी केली. फिर्यादी व त्यांचे सहकारी नाकाबंदी करीत असताना एक एसटी बस मुंबई गोवा हायवे रोडने वेगात येवुन ड्रायव्हरने गोरेगांवकडे जाण्यासाठी टर्न घेतला. नाकाबंदीसाठी बॅरेकेट लावलेली होती. एस.टी. बस वेगाने त्यांचे दिशेने येताना पाहून फिर्यादी व त्यांचे सहकारी सावधतेने बाजुला झाले. त्यावेळी त्या एस.टी. बस क्र.एम.एच.२० बी.एल.२१२२ ने बॅरेकेटला ठोकर मारुन ती गोरेगांव बाजुकडे थोड्या अंतरावर जावुन थांबली. बस चालकाला त्यांनी ताब्यात घेतले. त्याचवेळी बसचे मागुन आलेल्या एका तवेरा जीप मधील ड्रायव्हर त्यांचे जवळ आला व त्याने याच एस.टी. बसचे चालकाने मुंबई गोवा हायवे रोडवर तळेगाव गावचे हद्दीत चुकीच्या दिशेने ओव्हरटेक करुन जीपला डावे बाजुला घासत जावुन अपघात केला आहे असे सांगितले. बस चालकाच्या तोंडाचा वास आला त्यामुळे ब्रेथ अॅनालायझर च्या मदतीने तपासणी केली असता त्याने मद्य प्राशन केले

असल्याचे दिसून आले. सबब आरोपीविरूद्ध कार्यवाही होणेकरीता फिर्यादीने पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

**०३**. फिर्यादीच्या जबाबावरुन गोरेगांव पोलिस स्टेशन अधिकाऱ्यांनी गुन्हा नोंद क्र.११/२०१९ नोंद केला. सदर प्रकरणाचा तपास आर. डी. ढोबळे, सहा. फौजदार यांनी केला व तपास पूर्ण होताच वर नमूद कलमांन्वये आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०४**. आरोपीने भारतीय दंड विधानाचे कलम २७९ प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम १८४, १८५ अन्वये दंडनीय गुन्हा केल्याचा दोषारोप (निशाणी क्र.०४) त्यांच्यावर ठेवला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगून प्रकरण चालविण्याची विनंती केली.

**०५.** आरोपपत्राच्या अवलोकानावरुन व सरकार पक्षाच्या कथनावरुन मी पुढील मुद्दे विचारार्थ घेतले व त्यावरील निष्कर्षाची कारणमिमांसा मी खालील प्रमाणे केली आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | आरोपीने दिनांक २२.०३.२०१९ रोजी रात्री ०२.४५ वा.सु. मौजे लोणेरे फाटा ते गोरेगांवकडे येणा–या रोडवर, ता.माणगांव, जि.रायगड आरोपीने त्याच्या ताब्यातील एस.टी. बस क्र.एम.एच.२० बी.एल.२१२२ ही चालवित असताना रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन हयगयीने, बेदरकारपणे व अतिवेगाने चालवुन दुस– | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | या व्यक्तीच्या जीवीतास धोका होईल अशा रितीने बस चालवुन बॅरेकेटला जोरदार ठोकर मारुन अपघात केला व त्याद्वारे भा.द.वि.चे कलम २७९ अन्वये गुन्हा केला, ही बाब सरकार पक्ष सिध्द करतो काय ? | |
| २. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने वर नमुद वाहन सार्वजनिक रस्त्यावर वेगाने आणि सर्वसामान्य जनतेला घातक होईल अशा रितीने व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालविली व त्याद्वारे आरोपीने मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला काय ? | **नकारार्थी** |
| ३. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाण आरोपीने मद्य प्राशन करुन त्याच्या ताब्यातील वर नमूद एस.टी. बस ही रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन निष्काळजीपणे, बेदरकारपणे व अतिवेगाने चालवून अपघात केला व भा.द.वि.चे कलम १८५ अन्वये गुन्हा केला, ही बाब सरकार पक्ष सिध्द करतो काय ? | **नकारार्थी** |
| ४. | अंतिम आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>निष्कर्षाची कारणमिमांसा</u>

**०६.** अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी. जे. गावंड यांचा युक्तीवाद ऐकला. आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. के. लिमजे यांचा युक्तिवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ बाबत</u> :-**

पटलावरील उपलब्ध पुरावा एकत्रीत अवलोकनास्तव घेत असताना तथ्याची पुर्नरावृत्ती होवू नये म्हणुन प्रस्तुतचे मुद्दे मी एकत्रीत घेतले.

**०७.** अभियोगपक्षातर्फे पंच साक्षीदार श्रीधर (सा.क्र.१) यांनी पुराव्यात कथन केले की, दिनांक २९.०३.२०१९ रोजी एस. एस. भिलारे पोलीसांनी त्यांना पंचनाम्यासाठी लोणेरे फाटा येथे बोलाविले होते. घटनास्थळ हे भिलारे यांनी दाखविले होते. घटनास्थळावर पोलीसांनी पंचनामा केला. घटनास्थळावरील बॅरीगेट तुटलेल्या अवस्थेत आहे. निशाणी क्र.११ प्रमाणे त्यांनी पंचनामा सिध्द केला. पंच साक्षीदार श्रीधर (सा.क्र.१) यांनी उलटतपासात मान्य केले की, लोणेरे नाक्यापासुन १ मिनीटाच्या अंतरावर त्यांचे घर व व्यवसाय आहे. अपघातस्थळ हे गजबजलेले ठिकाण आहे. घटनास्थळावर सतत लोकांची वर्दळ असते. स्थानिक पातळीवर पोलीसांशी सदर साक्षीदार यांचे चांगले संबंध असून ब-याच दुस-या प्रकरणामध्ये पंच साक्षीदार म्हणून त्यांनी पोलीसांना मदत केली आहे. सदर साक्षीदार यांनी मान्य केले की, पंचनाम्यातील मजकूर सदर साक्षीदाराने सांगितला व त्याप्रमाणे पोलीसांनी लिहून घेतला असे काही घडले नाही. सकाळी ११.०० ते १२.०० वा.सु. त्यांची पंचनाम्यावर सही घेतली. लोणेरे नाका येथे रस्त्याला उजव्या बाजुला काटकोण स्वरुपाचे वळण आहे. एखादे मोठे वाहन सरळ दिशेने

आल्यास व लोणेरे नाका येथे अचानक वळण घेतल्यास सदरचे वाहन पलटी होवु शकते. लोणेरे नाक्यावर चहा, नाष्ट्याची लहान दुकाने दिवस रात्र सुरु असतात. अपघाताबाबत सदर साक्षीदार यांना पोलीसांकडून समजले.

०८. सदर पंच साक्षीदार श्रीधर (सा.क्र.१) यांच्या पुराव्यावरुन सिध्द होते की, घटनास्थळ हे काटकोन आकाराच्या वळणाच्या ठिकाणी आहे, त्या ठिकाणी मोठे वाहन सरळ येवुन अचानक वळण घेतल्यास पलटी होण्याची शक्यता आहे. सदर पंच साक्षीदार श्रीधर (सा.क्र.१) यांच्या पुराव्यावरुन त्याने पंचनाम्यावर सकाळी ११.०० ते १२.०० वाजण्याच्या सुमारास सही केली होती, परंतु निशाणी क्र.११ वरील पंचनाम्यानुसार पंचनामा हा सायंकाळी ०५.०० ते ०६.०० वा.सु. झालेला आहे. यावरुन असे दिसून येते की, सदर पंच साक्षीदार याने केवळ पोलीसांशी असलेल्या चांगल्या संबंधामुळे सही केलेली आहे. सबब, त्याचा पुरावा विश्वासार्ह वाटत नाही.

०९. अभियोगपक्षातर्फे फिर्यादी सतिष (सा.क्र.२) यांनी पुराव्यात कथन केले की, दिनांक २२.०३.२०१९ रोजी लोणेरे नाका येथे आंबेतकडे जाणा-या कॉर्नरवर डी.वाय.एस.पी. साहेबांच्या तोंडी आदेशान्वये नाकाबंदी होती. लोणेरे नाका येथे नाकाबंदी कर्तव्यावर ते व त्यांचे सहकारी असे हजर असताना रात्री ०२.४५ वा.सु. माणगांव बाजूकडून एक बस क्र. एम.एच.०६ बी.एल.२१२२ आली व बस चालकाने त्यांच्या अंगावर बस घातली. नाकाबंदीकरिता रस्त्यावर स्ट्रीट लाईट व बॅरीगेट्स लावलेले होते. बस चालकाने बॅरीगेट्सला ठोकर मारुन बस पुढे जावुन थांबविली होती. त्यानंतर भिलारे हे बस चालकाकडे गेले असता बस चालक हा दारु प्यायलेला असल्याचे आढळून आले. त्यानंतर ब्रेथ अॅनालायझर मशिनने तपासले असता चालक दारु पिल्याचे निष्पन्न झाले. सदर बसच्या पाठीमागे एक

तवेरा गाडी होती. तवेरा गाडीच्या चालकाने त्यांना सांगितले की, सदरची बस त्यांना मौजे तळेगाव येथे ओव्हरटेक करीत असताना त्यांच्या गाडीला घावून गेले. बस चालकाने त्याचे नाव आप्पासाहेब माणिक गर्जे असे सांगितले. त्यानंतर निशाणी क्र.१३ प्रमाणे आरोपीविरुध्द तक्रार दिली.

**१०.** अभियोगपक्षातर्फे फिर्यादी सतिष (सा.क्र.२) यांनी उलटतपासात मान्य केले की, मुंबई गोवा हायवे हा दक्षिणोत्तर वाहणारा रस्ता आहे. घटनास्थळावर गोरेगांव आंबेतकडे जाणा–या रस्त्याच्या पश्चिमेस ९० अंशांचे काटकोन वळण आहे. लोणेरे नाका हा वर्दळीचा रस्ता असून रस्त्याच्या आजुबाजुला अनेक घरे व दुकाने आहेत. घटनास्थळालगत रिक्षा स्टँड आहे व तेथे रात्रीच्या वेळी एक दोन रिक्षा उभ्या असतात. लोणेरे नाका येथे नाकाबंदी करणेकरीता वरिष्ठांचे त्यांना लेखी स्वरुपात आदेश नव्हते. नियमितपणे लोणेरे नाका येथे नाकाबंदी होत नाही. अपघाताची खबर दिनांक २२.०३.२०१९ रोजी दुपारी १२.२५ वा. दिली आहे. अपघातानंतर खबर दाखल करणेकरिता झालेल्या आठ ते दहा तासांच्या विलंबाचे कारण खबरेमध्ये नमूद नाही व त्याचे कारण ते सांगू शकत नाहीत. अपघाताच्या दिवशी त्यांच्या कामाची वेळ रात्री ११.०० ते सकाळी ०५.०० होती. दिनांक २२.०३.२०१९ रोजी सकाळी ०५.०० वा.सु. नाकाबंदी ड्युटी संपल्यानंतर त्यांना दुसरी ड्युटी नव्हती. साक्षीदार सांगतो की, अतिआवश्यक काम असल्यास त्यांना ड्युटीवर जावे लागते. बस चालक पळून गेलेला नव्हता.

**११.** फिर्यादी एस. एस. कदम (सा.क्र.२) यांच्या पुराव्यावरुन घटनेनंतर भिलारे यांनी तपासणी केली असता बस चालक दारु प्यायल्याचे आढळून आले. यावरुन स्पष्ट होते की, फिर्यादीने स्वतः बस चालक आरोपीस तपासलेले नाही.

तसेच घटना ही रात्री ०२.४५ वा. घडलेली असताना देखील तक्रार ही दिनांक २२.०३.२०१९ रोजी दुपारी १२.२५ वा. दिली आहे. यावरुन स्पष्ट होते की, तक्रार ही नऊ तास उशीराने दिलेली आहे. फिर्यादी हे पोलीस असताना देखील फिर्यादीने तक्रार देण्यास विलंब केलेला आहे. सदर बाबीं लक्षात घेता गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्याकरिता फिर्यादीच्या पुराव्यास भक्कम पुष्टी देणारा पुरावा अभिलेखावर येणे आवश्यक आहे.

**१२.** अभियोगपक्षातर्फे फिर्यादीच्या पुराव्याला पुष्टी देण्याकरिता दिलीप (सा.क्र.३) यांचा पुरावा नोंदविलेला आहे. दिलीप (सा.क्र.३) यांनी पुराव्यात कथन केले की, दिनांक २२.०३.२०१९ रोजी रात्री ०२.२५ वा.सु. नाकाबंदी दरम्यान माणगांव बाजूकडून एक एस.टी. अतिवेगात आली व गोरेगांव बाजूकडे टर्न मारुन त्यांच्या दिशेने येत असल्याचे दिसल्यानंतर ते बॅरीगेट्सपासून रोडच्या बाजूला गेले. एस.टी. बसने बॅरीगेट्सला धडक मारली व पुढे जावुन थांबली. त्यानंतर बस चालकाला खाली उतरुन जाधव यांनी त्याच्या तोंडाचा वास घेतला त्यावेळी तो दारु प्यायलेला असल्याचे लक्षात आल्याने त्याची दारुसेवन तपासणी यंत्राने तपासणी केली असता बस चालक दारु प्यायलेला असल्याचे दिसून आले. त्यावेळी माणगांव बाजूकडून एक तवेरा गाडीवरील चालक लोणेरे चौकीजवळ आला व त्याने सांगितले की, सदर बस चालकाने त्याच्या गाडीला विरुध्द दिशेने ओव्हरटेक करुन डाव्या बाजूकडील हेडलाईट फोडून पुढे निघून गेला. त्यानंतर त्यांनी बस चालकास गोरेगांव पोलीस स्टेशनला नेले.

**१३.** दिलीप (सा.क्र.३) यांनी उलटतपासात मान्य केले की, घटनास्थळ असलेला रस्ता गोरेगांवकडे जाताना पश्चिमेस ९० अंशाच्या काटकोनात वळलेला असून वर्दळीचा व त्या ठिकाणी बरीच दुकाने आहेत. सदर साक्षीदाराने मान्य केले

आहे की, घटनेच्यावेळी घटनास्थळालगत असलेल्या रिक्षा स्टॅन्डवर थोड्या रिक्षा उभ्या होत्या. दिलीप (सा.क्र.३) यांनी उलटतपासात मान्य केले की, घटनास्थळाच्या अलिकडे १०० फुटाच्या अंतरावर नाकाबंदी केल्याचा फलक लावला नव्हता. गणेश भिलारे (सा.क्र.४) यांनी दिलीप (सा.क्र.३) यांच्या पुराव्याशी सुसंगत पुरावा दिलेला आहे. गणेश भिलारे (सा.क्र.४) याने कथन केले की, वाहतुक कर्मचारी जाधव यांनी एस.टी. बस चालकाच्या तोंडाचा वास घेतला त्यावेळी तो दारु प्यायला असल्याचे लक्षात आल्याने त्याची यंत्राणे तपासणी केली. तपासणी केली असता १४० मि.ली. अल्कोहोलचे प्रमाण दिसले.

**१४.** गणेश भिलारे (सा.क्र.४) यांच्या पुराव्यावरुन आरोपी दारु प्यायलेला आहे याची खात्री जाधव यांनी केली होती. याउलट फिर्यादी सतिष (सा.क्र.२) यांच्या पुराव्यानुसार भिलारे यांनी आरोपी दारु प्यायलेला आहे याची खात्री केली. अभियोगपक्षाच्या पुराव्यावरुन साक्षीदारांच्या पुराव्यामध्ये तफावत दिसून येते.

**१५.** तपासी अधिकारी आर. डी. ढोबळे (सा.क्र.५) यांनी पुराव्यात कथन केले की, तपासादरम्यान दुसरे दिवशी घटनास्थळी जावुन निशाणी क्र.११ वरील पंचनामा त्यांनी सिध्द केला. नाकाबंदीसाठी उपस्थित असलेले पोलीस व बसमधील प्रवाशी यांचा जबाब नोंदविला. तवेरा गाडी चालकाचे तपास टिपण नोंदविले. अपघातातील बसचे यांत्रीक तपासणी आर.टी.ओ. कार्यालयाकडून करुन घेतली. बसचे कागदपत्र व ब्रेथ अॅनालायझर मशीनचा अहवाल हस्तगत केला. घटनास्थळावर सी.सी.टी.व्ही. फुटेज हस्तगत करुन त्याचे स्क्रीन शॉट अभिलेखात दाखल केले. तपासादरम्यान बस चालकाने मद्याच्या अंमलाखाली अतिवेगाने बस चालवुन पोलीसांच्या जिवीतास धोका होईल असे वाहन चालवुन बॅरीगेट्सला

धडक दिल्याचे निष्पन्न झाले.

**१६.** तपासी अधिकारी आर. डी. ढोबळे (सा.क्र.५) यांनी उलटतपासात मान्य केले की, मुंबई गोवा हा महामार्ग दक्षिण उत्तर असून तेथे वाहनांची वर्दळ असते. अपघाताचे वेळी मुंबई गोवा महामार्गाची एकच वाहिनी चालू होती व दोन बाजूची वाहने एकाच लेन ने जात येत होती. अपघाताचे वेळी रस्त्याला दुभाजक नव्हते. घटनास्थळी काटकोन आकारामध्ये पश्चिम दिशेला वळण असून तो रस्ता लोणेरे गोरेगांव वरुन श्रीवर्धनला जाते. घटनास्थळी उजव्या बाजुला रिक्षा स्टॅन्ड व दोन्ही बाजुला राहती घरे व दुकाने आहेत. त्या दिवशी नाका बंदीचे लेखी आदेश नव्हते. तोंडी आदेश मिळाल्यामुळे नाकाबंदी केली होती. महामार्गापासून वीस ते पंचवीस फुट अंतरावर बॅरीगेट्स लावले होते. नाकाबंदीच्या सुरुवातील तसा फलक लावलेला नव्हता. प्रथम खबरी अहवाल दहा ते अकरा तासानंतर दाखल झाला आहे त्या विलंबाचे स्पष्टीकरण दिलेले नाही. त्या तवेरा चालकाने आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार केलेली नव्हती. बसमधील प्रवाशांनी देखील आरोपी दारु पिलेला आहे अशी तक्रार दिलेली नव्हती. गुन्हा दाखल झाल्यानंतर अल्कोहोल संदर्भात आरोपीच्या रक्ताची तपासणी केली नाही. घटना घडल्यापासुन पाच दिवस उशीराने घटनास्थळ पंचनामा केला असून त्याबाबतचे स्पष्टीकरण सदर साक्षीदार यांनी दिलेले नाही.

**१७.** अभियोग पक्षाचा एकंदरीत पुरावा पाहता अभिलेखावर अभियोगपक्षाने केवळ पोलीस साक्षीदारांचा पुरावा सादर केलेला आहे. वर नमूद केल्याप्रमाणे पंच साक्षीदार यांचा पुरावा विश्वासार्ह वाटत नाही. अभिलेखावरील पुराव्यावरुन घटनास्थळ हे वर्दळीच्या ठिकाणी असून घटनेच्यावेळी त्या ठिकाणी काही चहाची दुकाने उघडी होती व काही रिक्षा उभे होते. अशी परिस्थिती असताना देखील

अभियोगपक्षाने त्यापैकी कोणत्याही व्यक्तीचा पुरावा अभिलेखावर नोंदविलेला नाही. तसेच एस. टी. बसमधील कोणत्याही प्रवाशाचा जबाब नोंदविलेला नाही. अभियोगपक्षाने तोंडी पुराव्यात नमूद केलेल्या तवेरा गाडी चालक अथवा प्रवाशांचा देखील जबाब अभिलेखावर नोंदविलेला नाही. त्यामुळे स्वतंत्र साक्षीदार उपलब्ध असताना देखील अभिलेखावर कोणत्याही स्वतंत्र विश्वासार्ह साक्षीदाराचा पुरावा आलेला नाही.

**१८.** अभियोगपक्षाच्या तोंडी पुराव्यावरुन घटनेनंतर आरोपीची ब्रेथ अनालायझर मशीनद्वारे तपासणी केली होती. परंतु तसा अहवाल अभिलेखावर सिध्द केलेला नाही. अभियोगपक्षाच्या पुराव्यानुसार जाधव यांनी आरोपीची तपासणी केली असता आरोपीने दारु पिल्याचे आढळून आले, परंतु अभियोगपक्षातर्फे जाधव यांचा पुरावा अभिलेखावर नोंदविलेला नाही. त्यामुळे घटनेच्यावेळी आरोपीच्या दारुच्या अंमलाखाली होता हे अभिलेखावर सिध्द झालेले नाही.

**१९.** अभियोगपक्षाच्या पुराव्यावरुन घटनास्थळ हे महामार्गापासून गोरेगांवकडे जाणा–या रस्त्याला काटकोन आकाराच्या वळणावर आहे. तसेच अभियोगपक्षाच्या पुराव्यानुसार त्या ठिकाणी मोठ्या वाहनाने महामार्गापासुन अचानक वळण घेतल्यास गाडी पलटी होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीमध्ये पोलीस साक्षीदारांनी नाकाबंदीच्या ठिकाणी कोणताही फलक लावलेला नव्हता व त्याठिकाणी नियमित नाकाबंदी नसते. बॅरीगेट्स कशा परिस्थितीत लावले होते याबद्दल अभिलेखावर काहीही आले नाही. अभियोगपक्षाच्या कथनानुसार घटनास्थळावर सी.सी.टी.व्ही. उपलब्ध असताना देखील त्याबाबतचा पुरावा अभिलेखावर सिध्द केला नाही. सदर एस.टी. बसमधील कोणत्याही प्रवाशाला

कोणतीही जखम झाली नव्हती व घटनास्थळाची सदर परिस्थती लक्षत घेता आरोपीने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बस चालविली ही बाब विश्वासार्ह वाटत नाही.

२०. एकंदरीत अवलोकनावरुन अभिलेखावर कोणताही वैद्यकीय पुरावा आलेला नाही. तसेच कोणत्याही प्रत्यक्षदर्शी अथवा स्वतंत्र विश्वासार्ह साक्षीदाराचा पुरावा आलेला नाही. अशा परिस्थितीत तक्रार देण्यास झालेला विलंब लक्षात घेता अभियोगपक्षाचे कथन विश्वासार्ह वाटत नाही. म्हणून आरोपीने त्याच्या ताब्यातील नमूद एस.टी. बस रस्त्याच्या परीस्थितीकडे दुर्लक्ष करून, दारु पिऊन निष्काळजीपणे व हयगयीने चालवून बॅरीगेट्सला धडक दिली ही बाब संशयापलीकडे सिध्द झालेली नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, **मुद्दा क्र.१ ते ३** ला **नकारार्थी** निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ बाबत** :–

२१. मुद्दा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात आल्याने आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. उपरोक्त विवेचनानुसार मुद्दा क्र.४ च्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी आप्पासाहेब माणिक गर्जे यास फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम २७९ प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम १८४, १८५ अन्वये दंडनीय गुन्हा केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचा पूर्वीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करणेत येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७ अ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये १५०००/– चा जातमुचलका व जामीन कदबा देऊन पूर्तता करावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)**

SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2026.04.10 18:37:46 +0530

माणगाव. [श्रीमती अ.प्र.मानव(श्रीमती अ. ब. सोनटक्के)]

दिनांकः–१०.०४.२०२६. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माणगाव.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | A.V. Chavan, Stenographer |
| Name of the Court | :- | Smt. A. P. Manav<br>Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.<br>Mangaon. Tal:-Mangaon. |
| Date of decision | :- | 10.04.2026 |
| Order signed by P.O. on | :- | 10.04.2026 |
| Order uploaded on | :- | 10.04.2026 |